18 महाराष्ट्र टाइम्स | प्रतिक्रियेसाठी mtngpletters@gmail

महाराष्ट्र टाइम्स

.com विचार नागपूर ■ शुक्रवार, ९ डिसेंबर २०१६ | edit.mtonline.in

# ई बुक : नव्या काळाचं माध्यम



रोहन चंपानेरकर



[ खुल्या मनाने लेखक आणि प्रकाशकांनी जर ई बुकचं नवं माध्यम स्वीकारलं, तर नक्कीच वाचन संस्कृतीला नवी दिशा, नवी चालना मिळेल. ]

अलीकडेच जर आपण ॲमेझॉन.इन ही वेबसाइट बघितली, तर 'किंडल ई बुक्स इन फाइव्ह इंडियन लँग्वेजेस' असं वाचायला मिळेल. आणि मुख्य म्हणजे या भारतीय भाषांत मराठीचा समावेश केला गेला आहे. सध्या यामध्ये मराठीतील अतिशय मोजकी पुस्तकं बघयला मिळत असली, तरी ही एका नव्या पर्वाची सुरुवात आहे. याआधी दुसऱ्या कोणी हा प्रयत्न केला नाही किंवा कोणी धाडस केले नाही असं नाही, पण जेव्हा त्या क्षेत्रातली एक अग्रगण्य कंपनी यात उतरते तेव्हा साहजिकच लोकांचं लक्ष याकडे वेधलं जाणार.

गेल्या दोन वर्षांपासून याची चाहूल प्रकाशन क्षेत्रातल्या जाणकारांना लागली होतीच. तसेच यापूर्वी ई बुक या संकल्पनेची ओळख अनेक वृत्तपत्रांनीही वेळोवेळी करून दिली होती. काही संस्थांनी ई बुक तयार करून ती वाचकांपर्यंत पोहोचवण्याचाही प्रयत्न केला. पण त्या उपक्रमाला तितकासा प्रतिसाद लाभलेला दिसला नाही. तरी तंत्रज्ञानाचा वापर करून काय साध्य करता येईल यासाठी अनेक अभिनव प्रयोग आणि प्रयत्न होत असल्याचे नक्कीच बघायला मिळत आहेत. मात्र जोपर्यंत गाजलेली व चांगली पुस्तकं ई बुकच्या माध्यमातून येत नाहीत, त्याचप्रमाणे नावाजलेले लेखक आणि उच्च निर्मितीसाठी कटिबध्द असलेले कल्पक प्रकाशक, हे पुस्तकनिर्मितीतील महत्त्वाचे घटक या नवमाध्यमात धडाडीने उतरणार नाहीत तोपर्यंत हे नवं माध्यम वाचकांना आकृष्ट करू शकणार नाही.

वाचकांच्या मनात ई बुक हे नवं माध्यम तेव्हाच घर करेल, जेव्हा वाचनाचा त्यांचा अनुभव हा छापील पुस्तकापेक्षा अधिक सुखद होईल! कमी पैशात, कमी जागेत जास्ती पुस्तकं, अगदी सहज होणारी उपलब्धता आणि सुलभ वाचनाच्या अनेक सोयी ही ई बुकची वैशिष्ट्ये आहेत. 'युझर फ्रेंडली' तंत्रज्ञान जितकं महत्त्वाचं आहे, तितकाच त्याचा योग्य वापर आणि त्यासाठी लागणारी व्यापक दृष्टीही महत्त्वाची आहे. आजच्या इंटरनेट युगात 'इ' म्हटलं की 'सर्व फुकट' ही मानसिकता मात्र सर्वांनी बदलायला हवी. त्या शिवाय चांगलं साहित्य या माध्यमातून उपलब्ध होणार नाही. पायरसीचा, बनावट पुस्तकांचा धोकाही संपूर्णपणे टाळता येत नाही. पण हेही लक्षात घेतलं पाहिजे, की आज तंत्रज्ञान विकसित होत आहे आणि पायरसी करणं सहजासहजी शक्य नाही. आणि तसं पहिला गेलं, तर छापील पुस्तकांची पायरसी होतच आहे. एकूण विचार करता असं म्हणावं लागेल, की वाचकांची मानसिकता बदलणं हेच महत्त्वाचं आहे. वाचकाचं पुस्तकाशी व त्याच्या लेखक-प्रकाशकाशी एक सुंदर नातं जुळतं आणि ते नातं निश्चितच अधिक मौल्यवान आहे. वाचकांच्या आनंदासाठी व सोयीसाठी लेखक-प्रकाशक तेव्हाच झटू शकतील जेव्हा वाचक हे नातं जपतील आणि तव्हाच उत्तम साहित्याची नव-निर्मिती होत राहील.

तंत्रज्ञानाने कायमच ग्राहकांच्या आयुष्यात अमुलाग्र बदल केले आहेत. त्यांच्या रोजच्या सवयी बदलून जगण्याला, नव्या पद्धतीने सामोरं जायला त्याला भाग पडलेलं आहे. आणि आता 'आपण वाचनाचं नवं माध्यम वापरून पाहू या का?' या प्रश्नापर्यंत येऊन तो येऊन ठेपला आहे. गेल्या २-३ वर्षांत बहुतेकांच्या जीवनात स्मार्ट फोन नावाच्या अष्टपैलू उपकरणाने जागा घेतली आहे. स्मार्ट फोनमधील उपलब्ध सोयींमुळे अगदी बँकेच्या व्यवहारापासून ते विमानाचे तिकीट बुक करण्यापर्यंत आपली अनेक कामं ॲप्सद्वारे सहज शक्य झाली आहेत. एकंदरीत अँड्रॉइड तंत्रज्ञानाने चांगलाच जम बसवला आहे. ह्याच पार्श्वभूमीवर सहा नामवंत प्रकाशक एकत्र येऊन ई बुक्सचा एक अभिनव प्रकल्प सकारात आहेत. रोहन प्रकाशन, ज्योत्स्ना प्रकाशन, मौज प्रकाशन गृह, राजहंस प्रकाशन, कॉन्टिनेन्टल प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन ह्यांची काही पुस्तकं इ बुक्सच्या स्वरूपात लवकरच वाचकांना उपलब्ध होणार आहेत. MarathiReader appद्वारे आपल्याला हवे असलेले इ बुक ऑनलाइन पेमेंटद्वारे विकत घेऊन आपल्या स्मार्ट फोन अथवा टॅबवर वाचक वाचू शकतील. अक्षराचा आकार लहान-मोठा करणे, मजकूर हायलाइट करणे, पानाला बुकमार्क करणे अशा या अनेक सुविधा MarathiReader appद्वारे वाचकांना मिळणार आहेत. ही ई बुक्स छापील पुस्तकाच्या मूळ किमतीहून बरीच स्वस्तही असणार आहेत. भविष्यात या प्लॅटफॉर्मवर इतर लेखक-प्रकाशकांची पुस्तकंही उपलब्ध होणार आहेत.

भारतात आता कुठे ई बुक्स संस्कृतीची सुरुवात होत आहे. जगभरातलं चित्र पाहिलं, तर असं दिसतं की, एकूण पुस्तक विक्रीच्या तुलनेत ई बुक्सची विक्री सध्या अंदाजाने १७ टक्के आहे. हेच प्रमाण दोन वर्षांपूर्वी २२ टक्के असं होतं. म्हणजे वर्षभरात वाढण्याऐवजी कमी झालं आहे. तेव्हा येत्या काही वर्षात छापील पुस्तकं विरूद्ध ई बुक्स ही टक्केवारी कशी असेल हे आज सांगता येणं मुश्किल आहे. हे लक्षात घेतलं पाहिजे, की स्मार्ट फोनचा जनसामान्यात होत असलेला प्रसार, विस्तारत असेलेलं इंटरनेटचं जाळं आणि ई बुक्समुळे सहजगत्या होणारी पुस्तकांची उपलब्धता या सर्व गोष्टीचा एकंदरीत सकारात्मक परिणाम होऊन पुस्तकांची बाजारपेठ वाढण्याची शक्यता अधिक आहे. मधल्या आणि जुन्या पिढीला छापील पुस्तकं अधिक सोयीची असल्याने ती मागणीत राहतील, तर नव्या तंत्रज्ञानात उपलब्ध होणाऱ्या पुस्तकांमुळे नवी पिढी ई बुक माध्यमातून आकृष्ट व्हावी. नवी पिढी जितकी नव्या तंत्रज्ञानाला सहज स्वीकारते, तितक्याच खुल्या मनाने लेखक आणि प्रकाशक ह्यांनी जर हे नवं मध्यम स्वीकारलं, तर नक्कीच वाचन संस्कृतीला नवी दिशा, नवी चालना मिळेल यात शंका नाही.

*(लेखक प्रकाशन व्यवसायात आहेत.)*